अत्यंत महत्वाचे व तातडीचे

# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ

(सेंट्रल प्रोव्हींसेस शासन शिक्षण विभागाची अधिसूचना क्रमांक ५१३ दिनांक १ ऑगस्ट, १९२३ द्वारा स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) द्वारा संचालित विद्यापीठ)

(परीक्षा मूल्यमापन मंडळ कार्यालय)

ई-मेल: coe@nagpuruniversity.nic.in

क्रमांक: रातुमनावि/पमूमं२०/
दिनांक : १८ सप्टेंबर २०२०

## विद्यार्थ्यांचे परीक्षे संबंधिच्या प्रश्नांचे उत्तरं

### (Frequently asked Questions related to Summer-2020 Exam)

**प्र. १ :** मी अंतिम वर्षाच्या अंतिम सत्रात उन्हाळी २०२० मध्ये होतो. माझे आधीचे सर्व सत्र आणि विषय क्लिअर आहेत आणि आता फक्त अंतिम सत्राची परीक्षा राहिली आहे, तेव्हा माझी परीक्षा कशी होईल ?

**उत्तर** : तुम्हाला १ ऑक्टो. ते १८ ऑक्टो. दरम्यान विद्यापीठाद्वारे संकेतस्थळावर प्रकाशीत वेळापत्रकार अनुसार घेण्यात येणाऱ्या ऑनलाईन बहू पर्यायी प्रश्न पद्धतीच्या (MCQ) परीक्षेत सहभागी होऊन परीक्षा द्यावी लागणार आहे.

**प्र. २ :** मी २०१९-२० सत्रात अंतिम वर्षात होतो परंतु अंतिम सत्राव्यतिरिक्त माझे आधीच्या सत्राचे बॅकलॉग विषय राहिले आहेत. अशा केस मध्ये माझी परीक्षा कशी होईल ?

**उत्तर** :अंतिम सत्राची परीक्षा प्रश्न क्र. १ च्या उत्तराप्रमाणे होईल. परंतु आधीच्या सत्रांच्या विषयांची बॅकलॉग परीक्षा तुमच्या महाविद्यालयात महाविद्यालय स्तरावर घेण्यात येतील. त्याकरिता महाविद्यालयाशी संपर्क साधून परीक्षेची तारीख आणि वेळ माहिती करून घ्यावी आणि परीक्षा द्यावी.

**प्र. ३ :** मी आता २०२०-२१ या शैक्षणिक वर्षाच्या अंतिम वर्षात प्रवेश घेतला आहे तेव्हा बॅकलॉग विषयांची परीक्षा देवू शकतो का ?

**उत्तर** : नाही. बॅकलॉग विषयांची परीक्षा फक्त त्याच विद्यार्थ्यांकरिता आहे जे २०१९-२० किंवा त्याआधीच्या शैक्षणिक वर्षात अंतिम वर्षाच्या अंतिम सत्रात होते.

**प्र. ४ :** जे विद्यार्थी अंतिम वर्षाच्या अंतिम सत्रात होते ते सर्व विद्यार्थी बॅकलॉग विषयांची परीक्षा देवू शकतात का ?

**उत्तर** : अंतिम वर्षाचे अंतिम सत्र ज्यांनी पूर्ण केलेले आहे आणि आणि ज्यांनी बॅकलॉग विषयांच्या परीक्षेचे फॉर्म विद्यापीठात भरले होते अश्या विद्यार्थ्यांनाच बॅकलॉग विषयांची परीक्षा देता येईल .

**प्र. ५ :** ज्या विद्यार्थ्यांनी बॅकलॉग विषयांच्या परीक्षेचे फॉर्म विद्यापीठात भरलेले नाहीत अशे विद्यार्थी परीक्षेला बसू शकतात काय ?

**उत्तर** : नाही.

**प्र. ६ :** अंतिम सत्राची ऑनलाईन परीक्षा कशी घेण्यात येईल ?

**उत्तर :** विद्यार्थ्याच्या Android मोबाईल एप वरून परीक्षा घेण्यात येईल. (Apple Mobile नाही) त्याकरिता मोबाईल नंबर आपल्या महाविद्यालयाच्या प्राचार्यांना देणे आवश्यक आहे. जेणेकरून त्याच मोबाईल नंबरवर ओटीपी येईल आणि एप अक्टीवेट होईल.

**प्र. ७ :** ऑनलाईन परीक्षा सुरु असता नेटवर्क गेला तर परीक्षा खंडित होईल का ?

**उत्तर :** नाही. नेटवर्क गेल्यावर सुद्धा प्रश्नपत्र सोडवणे शक्य होईल. जेव्हा नेटवर्क येईल तेव्हा सोडवलेली प्रश्न पत्रिका अपलोड करता येईल. परंतु एक तास झाल्यावर, त्यानंतर सोडविलेल्या प्रश्नाचे उत्तर अपलोड होणार नाही. अर्थात त्याचे मार्कसुद्धा सिस्टीम मध्ये येणार नाही. एक तासाच्या आत सोडवलेल्या सर्व प्रश्नाचे उत्तरं उशिरा नेटवर्क आल्यावरही एप अपलोड करील.

**प्र. ८ :** ऑनलाइन परीक्षेचा निकाल कधी लागणार ?

**उत्तर :** शेवटल्या पेपर नंतर चार ते पाच दिवसात निकाल लावण्याचे प्रयत्न विद्यापीठाद्वारे करण्यात येईल.

**प्र.** ९ : जर काही कारणास्तव ऑनलाइन परीक्षा देणे शक्य झाले नाही तर काय होईल ?

**उत्तर :** जर एखादा विद्यार्थी ऑनलाइन परीक्षा देण्यास काही कारणास्तव असमर्थ असला तर अश्या विद्यार्थ्याची परीक्षा ऑफ लाईन पद्धतीने दिलेल्या जवळच्या केंद्रात नियोजित वेळापत्रकानुसार १८ ऑक्टो. २०२० नंतर आयोजित करण्यात येईल. ही परीक्षा सुद्धा ऑफलाईन पद्धतीने MCQ (बहु पर्यायी प्रश्न ) तत्वावर घेण्यात येईल. या मध्ये पेन आणि पेपर च्या माध्यमातून परीक्षा होतील. सोडविलेल्या उत्तरपत्रिका तपासल्यानंतर त्याचे निकाल जाहीर करण्यात येईल. यामध्ये ऑफलाईन परीक्षेचे निकाल लागण्यास उशीर होण्याची संभावना राहील.

**प्र.** १० : अंतिम वर्षाचे प्रक्टिकल/ प्रोजेक्ट/ सेमिनार/ वर्कशॉप/ dissertation इ. कशे होणार ?

**उत्तर :** अंतिम वर्षाचे प्रक्टिकल/ प्रोजेक्ट/ सेमिनार/ वर्कशॉप/ dissertation या सर्व परीक्षा विद्यार्थ्यांच्या महाविद्यालयाद्वारे ऑनलाइन/ ऑफलाईन किंवा मिक्स मोड पद्धतीने १५ सप्टे ते ३० सप्टे. २०२० पर्यन्त घेण्यात येतील. विद्यार्थ्यांनी आपापल्या महाविद्यालयाशी या परीक्षे करीता संपर्क साधावा.

प्र. ११ : मी तीन वर्षीय अभ्यासक्रमाची अंतीम वर्षाची परीक्षा म्हणजे शेवटच्या सत्राची परीक्षा हिवाळी २०१९ मध्ये दिली मी दोन विषया मध्ये नापास आहे आणि पाचव्या सत्राचे दोन पेपर मध्ये नापास आहे तर माझी परीक्षा कशी होईल?.

उत्तर : अंतीम वर्षाच्या अंतीम सत्राची म्हणजे सहाव्या सत्राची परीक्षा १ ते १८ तारखेदरम्यान विद्यापीठाव्दारे दिलेल्या वेळापत्राकानुसार Online पध्दतीने होईल. त्याव्यतीरीक्त 3rd /4th/5th सत्राची परीक्षा आपल्या प्रवेशीत महाविद्यालयात होईल त्याकरीता त्वरीत महाविद्यालयाशी संपर्क साधावा.

प्र. १२ : मी सध्या ३ वर्षीय अभ्यासक्रमाच्या अंतिम वर्षाच्या Vth Sem. प्रवेशित ला आहे, माझे IIIrd/IVth Sem. चे बॅकलॉग आहे त्या विषयाची परीक्षा आता महाविद्यालयात होईल काय?.

उत्तर : नाही, सध्या अंतिम वर्षात प्रवेश असलल्या विद्यार्थीच्या परिक्षा होणार नाही. त्याकरीता आपणास पुढे आपणास विद्यापीठाव्दारे/महाविद्याल्या मार्फत कळविण्यात येईल.

प्र. १३ : मी B. A. चा External विद्यार्थी आहे. माझी परीक्षा कधी होणार आहे.

उत्तर : B.A./M.A./LLM या अभ्यास क्रमाकरीता जे विद्यार्थी External म्हणुन परीक्षा देत आहे त्याची परीक्षा आता होणार नाही. त्याना पुढील सत्रात प्रवेश मीळतील, परीक्षा अर्ज भरण्याची प्रक्रीया सुरू झालेले आहे. व पुढे होण–या विद्यापीठाच्या परीक्षेत दोन्ही सत्राच्या परीक्षा घेता येईल.

प्र. १४ : मी अव्यावसायीक अभ्यासक्रमाचा (B.A./B.Sc./B.Com etc.) चा अंतीम सत्राचा विद्याथी आहे माझी बॅकलॉक ची परीक्षा कशी होईल?.

उत्तर : अंतिम सत्राची परीक्षा वगळुण सर्व व्यावसायीक आणि अव्यावसायीक अभ्यास क्रमातील पात्र असलेल्या विद्यार्थाची पदवीका, पदवी, व पदवित्तर परीक्षा महाविद्यालय स्तरावर होतील. त्याकरीता आवश्यक त्या सर्व सुचना प्राचार्य महोदय यांना दिलेल्या आहेत. बॅकलॉग परीक्षेकरीता पात्र असलेल्या विद्यार्थीची परीक्षा महाविद्यालयात Online/offline/mixed mode पध्दतीने होतील त्याकरीता विद्याथीनी महाविद्यालयाच्या प्राचार्य यांच्याशी त्वरीत संपर्क साधावा

प्र. १५ : मी उन्हाळी २०२० वर्षाच्या अंतीम वर्षाच्या अंतीम सत्राच्या परीक्षेचा फार्म भरला नसेल परंतु ईतर सत्राच्या बॅकलॉक असलेल्या परीक्षेचा फार्म भरला असेल तर मला अंतीम सत्र शिवाय इतर सत्राची परीक्षा देता येईल काय?

उत्तर : नाही, कारण अंतीम सत्राचा फार्म भरला नसल्यामुळे उन्हाळी परीक्षेत पदवी प्राप्त होण्याकरीता पात्र नसल्यामुळे इतर सत्राच्या परीक्षा महाविद्यालय स्तरावर घेता येणार नाही.

प्र. १६ : माझी उन्हाळी २०२० Online परीक्षा देण्याकरीता मला या Online परीक्षेचा सराव होउ शकेल काय?

उत्तर : होय, तुम्ही Google मधील Play store मधुन सदर App Download करूण दिनांक २४ ते २७ संप्टेबर. २०२० तारखे दरम्यान सदर Online परीक्षेची Mock test करू शकता.

प्र. १७ : विद्याथीनी online परीक्षे मध्ये Proctoring होणार आहे असे ऐकल आहे. Proctoring म्हणजे काय असते.

उत्तर : Online परीक्षेमध्ये विद्यार्थावर लक्ष (Supervision) ठेवणारी प्रणाली म्हणजे Proctoring या प्रणालीव्दारे आपली म्हणजे Proctoring या प्रणालीव्दारे आपल्या मोबाईल ॲपव्दारे विद्यार्थीच्या हालचाली, आवाज यांचे screen shot आपोआप Server ला येतील. विद्यार्थ्यानी मोबाईल वर दुसरी window/website जर उघडली तर ते सुध्दा त्वरीत कळेल. Proctoring मुळे विद्याथीनी फक्त परीक्षेवरस केंदीत असावे ईतर बाबीवर लक्ष ठेवू नये.

सदर प्रश्न विद्यार्थ्याच्या माहीती करीता विद्यार्थ्याव्दारे वारंवार विचारलेल्या प्रश्नासोबत निगडीत असुन संचालक (परिक्षा व मुल्यमांपण मंडळ) यांनी दिलेली आहे.